**<u>प्रतिवादीचा उलटतपास वादीतर्फे वकील श्री. एस.एन.भणगे यांचे मार्फत शपथेवर सुरु–</u>**

१२. हे म्हणणे खरे आहे की दुकान गाळा व नवीन दुकान गाळा या दोन्ही वेगवेगळ्या जागा आहेत. हे म्हणणे खरे आहे की जुना दुकान गाळा आता अस्तित्वात नाही. हे म्हणणे खरे आहे की वादीच्या लाईटच्या दुकानाच्या पुर्वेला माझा जुना दुकान गाळा होता व त्या दुकानाच्या पश्चिमेला माझा नवीन दुकान गाळा आहे. हे म्हणणे खरे आहे की माझ्या नवीन दुकान गाळ्याच्या पश्चिम दिशेस दोस्ती यांचे दुकान आहे. हे म्हणणे खरे आहे की माझा नवीन दुकान गाळा व दोस्ती यांची मिळकत यामध्ये एक दगडी भिंत आहे. हे म्हणणे खरे आहे की नवीन दुकान गाळा हा भर बाजारपेठेत मध्यभागी नगरपरिषदेच्या समोर आहे. हे म्हणणे खरे आहे की नवीन दुकान गाळ्याच्या पुर्व–पश्चिम बाजूस समोरील नगरपरिषदेची जागा सोडली तर संपूर्ण बाजारपेठ आहे. हे म्हणणे खरे आहे की नगर परिषदेच्या जागेमध्ये सर्व व्यापारी बसतात. हे म्हणणे खरे आहे की जुना दुकान गाळा हा माझ्या वडिलांना वादीच्या पुर्वजांनी चणे कुरमुरे विकण्याचा व्यवसाय करण्यासाठी दिला होता. हे म्हणणे खरे आहे की माझे राहते घर हे राम मारुती मंदिर रस्त्याच्या जवळ आहे. हे म्हणणे खरे नाही की राम मारुती मंदिर रस्त्याच्या जवळ माणिक चौक आहे. हे म्हणणे खरे आहे की माणिक चौक येथे अनेक वर्षांपासूनची बाजारपेठ आहे. हे म्हणणे खरे आहे की मी माझ्या राहत्या घरी भट्टी वगैरे लावून मी बेकरीचे उत्पादके तयार करतो. हे म्हणणे खरे आहे की पुर्वी मी बेकरीची उत्पादके जुन्या गाळयामध्ये ठेवून विक्री करीत असे. हे म्हणणे खरे आहे की आता मी बाहेरुन बेकरीचे उत्पादके विकत घेवून ते नवीन गाळ्यात विक्रीसाठी ठेवतो. हे म्हणणे खरे आहे की दुकान गाळयाचे प्रमाणित भाडे ठरवून मागण्यासाठी मी या न्यायालयात आजपर्यंत अर्ज केलेला नाही.

**(वादीच्या वकिलांच्या तोंडीविनंतीवरुन साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.)**

**श्रवणोत्तर स्विकृत,**
सही/–
(के.के.पाटील)

दिनांक– ११/०१/२०२४. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.